PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gho Mala Asla Hava
Year: 2009

Song: Gho Mala Asla Hava
Lyricist:

काळा नको गोरा नको
वागण्यामध्ये तोरा नको
गाडी नको माडी नको
हातामध्ये साडी नको
घो मला कसला हवा रं मेल्या
घो मला कसला हवा
घो मला कसला हवा रं मेल्या
घो मला कसला हवा
ज्याला बघताच काळजात माझ्या
कळ उठतीया वाजतोया बाजा
ज्याला बघताच काळजात माझ्या
कळ उठतीया वाजतोया बाजा
माझ्या जीवाचा घोर
थांबला श्वासाचा दोर
फडफड पापणीची लय
मोडल्या काटयाची सय
न सांगता न बोलता आपसुक
अर्ध्या रात्री तो वाजिवतो पावा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा

गावं शोधून शोधून
जोडं झिजून झिजून
तुझ्या बापसानं आणीला घो
आमका उमगना गो कित्याक सांगना गो
तुझ्या जिवात येईना त्यो
गावं शोधून शोधून
जोडं झिजून झिजून
तुझ्या बापसानं आणीला घो
आमका उमगना गो कित्याक सांगना गो
तुझ्या जिवात येईना त्यो

त्येच्या महालाची मी कशी राणी
सारी दुनिया वाजवते पिपाणी
त्येच्या महालाची मी कशी राणी
सारी दुनिया वाजवते पिपाणी
माझ्या डोल्यातलं आसू
माझ्या व्हटावरलं हासू
माझ्या मुरक्यातलं रूसू
बोटात रूतलेलं कुसू
माझ्या यादेनं झोप त्याच्या डोल्याची
जाई उडून दूरच्या गावा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
नरमी नको गरमी नको
बोलण्यामध्ये गुर्मी नको
भलत्या सलत्या खोडी नको
व्हटामदी बिडी नको
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा

गावं शोधून शोधून
जोडं झिजून झिजून
तुझ्या बापसानं आणीला घो

आमका उमगना गो कित्याक सांगना गो
तुझ्या जिवात येईना त्यो
गावं शोधून शोधून
जोडं झिजून झिजून
तुझ्या बापसानं आणीला घो
आमका उमगना गो कित्याक सांगना गो
तुझ्या जिवात येईना त्यो

जात पोरीची नाय काय इंचू
डंक पिरतीचा लावतोय नाचू
जात पोरीची नाय काय इंचू
डंक पिरतीचा लावतोय नाचू
बाई जीवाची भेटल मैतर
आन् मायेचा टाकल मंतर
बाई जीवाची भेटल मैतर
आन् मायेचा टाकल मंतर
तुझ्या इंचवाला हाय मी उतारा
शीण निवळून जाईल सारा
तुझ्या इंचवाला हाय मी उतारा
शीण निवळून जाईल सारा
हे गुपीत उमगल ज्येला
हे गुपीत समजल ज्येला
माझ्या भाळीचा त्यो चांदवा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
अघळ नको पघळ नको
वागण्यामधी लगळ नको
मटका नको गुटका नको
उठता बसता झटका नको
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा
घो मला असला हवा रं मेल्या
घो मला असला हवा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*